# युवा प्रगती

RNI No.MAHBIL/2011/39970

युवा प्रगती यशाचा सोपा मार्ग. . . एक सर्वांगिण शैक्षणिक पाक्षिक

**Yuva Pragatee** ... *a Simple Way to Success ... the complete Educational Magazine*

वर्ष १ ले * अंक १२ * मुंबई, दिनांक: १५ ते ३१ डिसेंबर २०११ पाने ४ * रूपये २ *

पान क्रं: १ * संपादक: किरण राणे * उपसंपादक: विकास थोरात *

सहाय्यक संपादक:
श्री. रूपेश मोकाशी

मुखपृष्ठ, सजावट व मांडणी:
श्री. राकेश वाणी

टाईप सेटींग व प्रिटींग:
श्री. अजय कदम
श्री. संदिप भोसले

छायाचित्र:
श्री. स्वदेश कुर्लेकर
श्री. दुर्गेश केठेकर

मुख्यवार्ताहार:
श्रीमती नम्रता पाटील
श्री. गणेश जगताप
कु. छाया विश्वकर्मा

जाहीरात व्यवस्थापक:
श्री. मुकेश विश्वकर्मा
श्री. जयवंत लोखंडे

विशेष सल्लागार:
प्रा. सुभाष पवार (महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेते ज्येष्ठ लेखक)
डॉ. भास्कर धाटावकर (ज्येष्ठ इतिहास अभ्यासक)
श्री. सचिन पिळणकर (महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेते व खगोलशास्त्र अभ्यासक)
डॉ. के. बी. ताशी
डॉ. गीतांजली डोंगरे
श्री. रामचंद्र पाटील
ॲडव्होकेट एस. ए. पटेल
प्रा. श्री. मनिष साळवी
श्री. मधुकर कांबळे

संचालक:
श्री. किरण राणे
श्रीमती सिध्दी राणे
श्री. एन. डी. पाटील

विशेष सहकार्य:
प्रगती फाउंडेशन, मुंबई.

## आतील पानावर . . .

✎ अफलातून गरीबी - संपादकिय विशेष

✎ आय.टी. गुरू - श्री. सचिन पिळणकर

✎ बोले तारे - नम्रता पाटील

✎ करीअर ॲकेदमि

# कॉम्प्युटर टिचर ट्रेनिंग ॲकेडमिज चा डिप्लोमा इन कॉम्प्युटर एज्युकेशन अभ्यासक्रमाचा वर्ष २०१० - ११ चा निकाल जाहीर. राज्याचा ७५% टक्के निकाल

### वर्ष २०११ - १२ पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲपलीकेशन साठी मान्यताप्राप्त सर्व्हीस प्रोवायडर म्हणून निवड

मुंबई प्रतिनिधी

आजचा जमाना ऑलराऊंडरचा आहे त्यामुळे एक कोर्स आणि करीअरचे अनेक पर्याय उपलब्ध असलेल्या कोर्सची मागणी आहे. प्रगती फाऊंडेशन मुंबई व पेस पुना या संस्थांनीं काळाची ही गरज ओळखली आणि या संगणक शिक्षण क्षेत्रात खास करून संगणक शिक्षक घडविण्यात डि.सी.एड. ( डिप्लोमा इन कॉम्प्युटर एज्युकेशन ) या परिपूर्ण कोर्सची निर्मीती केली आहे. आपल्याला एक व्यवसायिक आणि शिस्तबध्द संगणक प्रशिक्षक निर्माण करावयास हवा तेव्हाच दर्जेदार शिक्षण प्राप्त होऊन विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढेल हा दृष्टीकोन समोर ठेवून डि.सी.एड. या कोर्सची बांधणी केली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या विकासासाठी एक दर्जेदार संगणक प्रशिक्षक, उद्योजक व तज्ञ घडविणे हा दृष्टिकोन समोर ठेवून CTTA D.C.Ed. या उपक्रमाअंतर्गत प्रगती फाउंडेशने प्रथमच संगणक क्षेत्रात डी.एड स्वरूपाचा D.C.Ed. ( डीप्लोमा इन कॉम्प्युटर एज्युकेशन) हा कोर्स वर्ष २०१० – ११ मध्ये उपलब्ध करून माहिती तंत्रज्ञान युगात येणा-या समस्यांचे समाधान केले. वर्ष २०१० -११ मध्ये संस्थेमार्फत ४००० पेक्षा अधिक विदयार्थी यशस्वीपणे प्रशिक्षण घेत आहेत व आपल्या भावी करीअरचा प्रश्न सोडविला आहे.

सदर कोर्स यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विदयार्थ्यांना डिसेंबर महीना अखेर पर्यंत प्रशिक्षण केंद्रातून प्रमाणपत्र उपलब्ध होणार आहे. डिप्लोमाचे सदर प्रमाणपत्र हे ऑल इंडिया इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी असोशिएशन्स ( नवी दिल्ली ) यांच्या मार्फत प्रमाणित करण्यात आले आहे.

प्रगती फाऊंडेशनच्या या कार्याची दखल घेवून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ नाशिक यांनी संस्थेसोबत डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन ( एज्युकेशन, बिझनेस आणि इंडस्ट्री ) कोर्सची निर्मीती केली. या शिक्षणक्रमाची गुणवत्ता व व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या हेतूने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने प्रगती फाऊंडेशन मुंबई या संस्थेची सेवा पुरवठादार (Service Provider) म्हणून नेमणूक केली आहे. डि.सी.ए. - एज्युकेशन (D.C.A. – Ed.) या शिक्षण प्रणालीमुळे संगणक क्षेत्रात अमुलाग्र बदल होईल यामध्ये शंकाच नाही. जेणे करून राज्यातील ब-याच खाजगी संस्था, शाळा, कॉलेज व इतर संलग्न क्षेत्रामध्ये अनुभवी संगणक शिक्षकांची कमतरता दूर होण्यास मदत होईल. संगणक क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीमुळे दर्जेदार तंत्रज्ञ निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळे राज्यात रोजगार व स्वयं रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात संगणक शिक्षक म्हणुन करीअर घडविण्यासाठी एक उत्तम संधी उपलब्ध होईल. तसेच (D.C.A. – Business) व (D.C.A. – Industry) मुळे सध्या फोफावत असलेल्या बी.पी.ओ. इंडस्ट्रीलाही आय.टि.क्षेत्रात हवे असलेले ट्रेनर उपलब्ध होतील. आज प्रत्येक कॉरपोरेट कंपनीत दर्जेदार ट्रेनर हवाय.

म्हणजेच फक्त संगणक शिक्षकच नव्हे तर आय.टि. क्षेत्रात मागणी असलेले इतर तज्ञ व संगणक उद्योजग देखिल या डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशनमुळे निर्माण होतील. संभाषण कौशल्य, संगणक दुरुस्ती, वेब साईटची निर्मीती, ग्राफीक डीजाईनिंग, प्रोग्रामिंग, लाईव्ह प्रोजेक्ट, शैक्षणिक संस्था व त्यांचे स्वरूप, अकाऊंटींग इ. विषयांचा अंतर्भाव असल्याने या कोर्समुळे विदयार्थी परीपूर्ण होईल यात वादच नाही. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा विदयार्थी कमीत कमी बारावी परीक्षा उत्तीर्ण असावा सोबत एम.के.सी.एल. चा MS-CIT किंवा YCMOU चा बेसिक कॉम्प्युटर कोर्स पूर्ण केलेला असावा. तेव्हा विदयार्थी मित्रांनो "मिळवा आयटी क्षेत्रातील विस्तृत पर्याय आणि घडवा उज्वल भविष्य"

( सौजन्य : प्रगती फाऊंडेशन, मुंबई . )

# आखिल भारतीय सूचना प्रौद्योगिकी संगठन (AIITA) आणि प्रगती फाऊंडेशन मुंबई यांचा संगणकक्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यासाठी करार.



प्रगतीचे अध्यक्ष श्री राणे यांच्या सत्कार प्रसंगी
डावीकडून आयटाचे सचीव श्री राजीव श्रीवास्तव जी एम श्री राकेश चोप्रा प्रगतीचे अध्यक्ष श्री किरण राणे अल्मा टाईम्सचे संपादक श्री दिलीप पंडीत व प्रगतीचे महाराष्ट्र संन्वयक मुकेश विश्वकर्मा.

इंदौर : प्रतिनिधी : प्रगती फाऊंडेशन मुंबई या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यामध्ये मागील काही वर्षापासून चालू असलेल्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची दखल घेवून इंदौर स्थित आखिल भारतीय सूचना प्रौद्योगिकी संगठन (All India Association of Information Technology) या संस्थेने सहकार्याचा करार राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर करारानुसार प्रगती फाऊंडेशन मुंबई यांच्या कॉम्प्युटर टिचर ट्रेनिंग ॲकेडमिज मधून राबविण्यात येणा-या डिप्लोम इन कॉम्प्युटर एज्युकेशन या अभ्यासक्रमालाही स्वायत्त प्रणालीनुसार मान्यता देण्याचे ठरविण्यात आले आहे. याशिवाय आयटाचे विविध उपक्रम ही प्रगतीच्या प्रशिक्षण केंद्रातून राबविण्याचे ठरविण्यात आले. प्रगती फाऊंडेशन मुंबई या संस्थेचे अध्यक्ष श्री. किरण राणे यांची आयटाच्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षापदी नेमणूक करण्यात आली. आयटा ही संस्था केंद्र शासनाच्या आय.टी. विभागाच्या निगडीत विविध उपक्रम राबवित असणारी अग्रगण्य संस्था असून सदर करारामुळे महाराष्ट्रात दर्जेदार संगणकशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

आयटा या संस्थेचे अध्यक्षपदी ॲडव्होकेट संतोष शुक्लाजी असून ते ज्येष्ठ खासदार व आय. पी. एल. चे चेअरमन श्री. राजीव शुक्लाजी यांचे बंधू आहेत. आयटा व प्रगती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षात विविध उपक्रम राबविण्याचा मनोदय या प्रसंगी ॲडव्होकेट संतोष शुक्लाजी व श्री. किरण राणे यांनी बोलून दाखविला.

**संपादकिय विशेष**

# अफलातून गरीबी

श्री. किरण राणे

E-mail: kranein@gmail.com
yuvapragatee@gmail.com



अखेर सरकारला जाग आली आणि दारिद्रयरेषेचे निकष ठरविणारे जाहीर केलेले आकडे वास्तव परिस्थितीला धरून नाहीत याची जाणीव झाली. मात्र सरकारला हे शहाणपण सुचले ते चहूबाजुंनी विरोधकांसह सरकारमधूनच हल्लाबोल झाल्यानंतर. दारिद्रयाच्या नवीन व्याख्येचे न्यायालयात प्रतीपादन सादर केल्यानंतर सरकार आणि नियोजन आयोगावर सर्वच स्तरातून सडकून टीका झाली.नवीन निकष गरिबांची थट्टा करणारा आहे असा सूर उमटू लागला. या पार्श्वभूमीवर नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची भेट घेतली. या मुद्यावर ते लवकरच स्पष्टीकरण देणार आहेत. त्यामुळे दारिद्रयरेषेचे निकष बदलून गरिबांना थोडातरी न्याय मिळेल. अशी तूर्तास अपेक्षा करूया. नियोजन आयोगाने न्यायालयात केलेल्या प्रतिज्ञापत्रात शहरात प्रती दिन ३२ रूपयांपेक्षा जास्त व ग्रामीण भागात २६ रूपयांपेक्षा अधिक खर्च करणारा माणूस गरीब नाही असे म्हटले आहे. या नवीन व्याख्येवर देशभर संतप्त प्रतीक्रीया उमटली. एका मोठया वर्गाला दारिद्ररेषेबाहेर ढकलून त्यांच्या सर्व सुविधा बंद करण्याच्या या निर्णयामुळे गरिब आणखीणच गरिबीच्या खाईत लोटला जाणार आहे. कॉंग्रेसचे युवराज यांनीही याची दखल घेत नियोजन आयोगाला दारिद्ररेषेची नवी व्याख्या करण्यास सांगीतले आहे. राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांनीही या व्याख्येला आव्हान दिले आहे.

तर दारिद्रय निर्मूलनात काम करणा-या स्वयंसेवी संघटनांनीही याविरोधात तीव्र निषेध नोंदवला. हा वाद पंतप्रधानांकडे पोहचल्यानंतर आता मॉंटेकसिंग अहलुवालिया यांनी पंतप्रधानाची भेट घेतली असून स्पष्टीकरण देणार आहेत. कदाचीत हे आकडे बदललेही जातील. पण, यातून सरकारची यामुळे झालेली नाचक्की कशी भरून निघेल.

दारिद्रयाच्या आकडेवारीतून नियोजन आयोगाच्या अर्थतज्ज्ञांनी आपल्या बौध्दिक दिवाळखोरीचे दर्शन घडवीले. यातून आपल्या अनर्थशास्त्राचे प्रदर्शन करणा-या आयोगाने गरिबांचा जगण्याचा हक्कच नाकारला. केवळ सरकारवर पडणा-या अनुदानाचा बोजा कमी करण्यासाठी आकडेवारीचा हा खेळ मांडला. याला अर्थतज्ज्ञ असणा-या पंतप्रधानांचीही साथ होतीच. कारण त्यांच्या संमती शिवाय नियोजन आयोग ही व्याख्या करणे शक्यच नाही.नवीन निकषांच्या कागदावर सही करून त्यांनीही गरिंबांबद्दलच्या आपल्या उदासीन धोरणाचे दर्शन दिले.

नियोजन आयोगाचे पदसिध्द अध्यक्ष असलेल्या पंतप्रधानांनी याकडे डोळेझाक का केली हे अनाकलनीय आहे. आता मात्र टिकेची झोड उठल्यानंतर सरकारला पर्यायाने मनमोहन यांनाही जाग आल्याचे दिसत आहे. म्हणजे या आगोदर आयोग आणि सरकारने झोपेचे सोंग घेतले होते. आम आदमीच्या मुद्यावर निवडणूका लढविणा-या आणि जिंकणा-या कॉंग्रसने गरिबांची उपेक्षाच केली. सलग दोनदा सत्ता मिळाल्यानंतर या गरीबांचा कॉंग्रेसला विसर पडला आणि त्यांची यांनी कूर चेष्टा सुरू केली. कदाचीत राहूल गांधीना वाढत्या

जनक्षोभाची जाणीव झाली असावी. त्यांनी दारिद्रयची नवीन व्याख्या करण्यास सांगून सरकारला घरचाच आहेर दिला.यानंतर फक्त नामधारी पंतप्रधानपद भूषविणा-या मनमेहनसिंगमधील खरा अर्थतज्ज्ञ जागा झाला. आता कदाचीत नवीन आकडे येऊन दिलासा देण्याचा प्रयत्न होईल पण ही. आकडेवारी वास्तव परिस्थितीला धरून असेल याची खात्री काय? गरिबी कधीही न बघितलेल्या आणि संबंध न आलेले नियोजन आयोगाचे सदस्य गरिबीची काय व्याख्या करणार ... ? गरिब कसा जगतो आणि दोन वेळच्या जेवनासाठी त्याची जगण्याची कशी लढाई असते, याची वातानुकुलीत घर, कार्यालय, आणि गडी असणा-या आयोगाच्या सदस्यांना कशी जाणीव असणार ... ? अगदी ३२ रूपये नाही तर १०० रूपयातही सध्याच्या या महागाईत यांनी एक दिवस काढून दाखवावा. मग यांना गरिबी आणि गरिबीची व्याख्या काय असावी याचे भान येईल. आंतरराष्ट्रीय मानकानुसार प्रति दिन १ डॉलरपेक्षा कमी कमावणारा गरीब मानला जातो. आज रूपयाचा भाव प्रती डॉलर ५० रूपये आहे.म्हणजे आपल्या तज्ज्ञानी यापेक्षा कमी रूपयांचा निकष ठेवला आहे. महासत्तेची आस असणा-या देशाने गरिबांना उपाशी ठेवून गरिबी उच्चाटणाचा आगळा वेगळा चंग बांधला असल्याचेच यातून प्रतीत होते.

नियोजन आयेगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात दारिद्रयरेषेखालील अटी पाहता न्यायदेवतेसमोरच आयोगाने गरीबांवर अन्याय केला. मग आता त्याने दाद कुणाकडे मागायची..?

आयोगाच्या या अटी म्हणजे गरिबांची कूर थट्टाच आहे. शहरी भागात ९५५ रूपये आणि खेडेगावात ७८१ रूपये दर महिण्याला खर्च करणा-या व्यक्तीला आता गरीब मानता येणार नाही. त्यांच्या परिवाराला आता दारिद्रय रेषेखालील सुविधाही मिळणार नाहीत. नियोजन आयोगाच्या या नवीन निकषांच्या कागदावर अर्थतज्ज्ञ असलेल्या पंतप्रधान मनमोहन सिंग यांची सही आहे. म्हणजे पाच सदस्य असलेल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी एवढी रक्कम पुरेशी आहे, असे अर्थतज्ज्ञ आणि भारत सरकार मानते. चार दशकांपूर्वी इंदिरा गांधीनी 'गरिबी हटाव' हा नारा दिला होता. पण आता त्यांच्याच पक्षाच्या सरकारणे गरिबांना हटविण्याचा चंगच बांधला आहे. गेले सलग वर्षभर महागाईत हात पोळलेल्या सर्वसामान्याला नियोजन आयोगाच्या या वैचारिक दारिद्रयाने आणखी दारिद्रयात ढकलले. जीवनावश्यक वस्तूंचे गगनाला भिडलेले भाव कमी करण्यासाठी सरकार मागील वर्षापासून अटोकाट प्रयत्न करीत आहे. महागाईची चांगलीच कल्पना असणा-या सरकारच्या एका अतिवरीष्ठ संस्थेने दारिद्रयाचे नवीन निकष करताना ही महागाई डोळयाआड करण्याचा काय अर्थ होतो. फक्त कागदावरून दारिद्रय हटविले म्हणजे देशातील दारिद्रय गेले असा समज करून घेणा-या नियोजन आयोगाच्या समस्त अर्थतज्ज्ञांनी आपली बुध्दीच गहाण टाकल्याचे पुरावे देण्यासाठी यासारखे दुसरे कोणते उदाहरण असेल. अर्थ शास्त्राचे उच्च ज्ञान असलेल्या तज्ज्ञांनी गरिबीचे अनर्थशास्त्रच मांडले आहे. सरकारी सोयी-सुविधा फुकटात मिळवणा-या या बौध्दिक दिवाळखोर तज्ज्ञांचा कधी महागाईशी साधा संबंधही आला असेल का ? नियोजन आयोगाने व्यक्तीच्या दररोजच्या खर्चाचा ताळेबंदही मंडला आहे. रोज तांदूळ व गव्हासाठी ५ रूपये ५० पैसे, दुधासाठी २रूपये ३३ पैसे, भाज्यांसाठी १ रूपया ९५ पैसे, तेलासाठी १ रूपया ५५ पैसे, साखर आणि मिठमसाल्यासाठी अनुकमे ७० आणि ७८ पैसे, गॅस सिलेंडर किंवा रॉकेलसाठी ३ रूपये ७५ पैसे तर महिण्याला कपडे खरेदी करण्यासाठी ६१ रूपये ३०पैसे, चप्पल बुटासाठी ९ रूपये ६० पैसे घरभाडे देण्यासाठी ४९ रूपये १०पैसे पुरेसे आहेत. असे नियोजन आयोग म्हणते.

पृष्ठ कमांक : ३ वर . . . .

युवा प्रगती



# IT GURU

श्री. सचिन पिळणकर
yuvapragatee@gmail.com

**माऊस वापरणारयांसाठी टिप्स**

१.एखादी न्यूजसाइट किंवा एखादा मोठा रिपोर्ट वाचायचा असेल तर सारख स्क्रोल करत बसण्यापेक्षा तुमच्या माऊसवरील स्क्रोल व्हिलवर क्लिक करा. स्क्रीनवर एक आयकॉन येईल. आता तुम्ही ज्या दिशेने वरच्या किंवा खालच्या फिरवाल त्या दिशेने ते पेज आपोआप स्क्रोल होईल.

२.स्क्रोलिंग करताना तुम्ही नीट लक्ष दिलत तर दिसेल की एका वेळी त्या पेजवर केवळ तीन किंवा चार ओळीच खाली किंवा वर जातात. स्क्रलींग स्पीड वाढविण्यासाठी पुढील स्टेप्स वापरा.

विण्डोजमध्ये स्टार्टवर क्लिक करा.
रन कमांड देऊन regit टाईप करा.
एन्टर केल्यानंतर
HKEY_CURRENT_USER\Control Panal \ Destop येथे जा.
त्यात WheelcrollLines वर जाऊन एडिट करा.
तीथे जी व्हॅल्यू असेल. ती कमी केल्यास ( म्हणजे डिफॉल्ट व्हॅल्यू ४ असताना १ केली तर स्क्रोलिंग अधिक सेन्सिटिव्ह होईल.)
कॉम्प्युटर रिस्टार्ट केल्याशिवाय फरक जाणवणार नाही.

३.तुम्हाला माऊसमधील सिंगल आणि डबल क्लिक माहित असेल.पण त्यात ट्रिपल क्लिकही असते. हे माहितीये का
वेबपेज किंवा डॉक्यमेंटमधील एखादी ओळ किंवा पॅराग्राफ कॉपी करायचा असेल. तर तीन वेळा लेफ्ट क्लिक केल्यास ती ओळ किंवा पॅराग्राफ सिलेक्ट होईल. तो तुम्ही कॉपी करू शकाल. या सगळया टिप्स अर्थातच लेफ्ट बटनसाठी आहेत. पण राईट बटनही क्लिक करून प्रॉडक्टिव्हिटी वाढविता येते. तुमच्या माऊसवरील राईट बटन डबल क्लिक करून तुम्हाला हवी ती ॲक्शन पार पाडू शकता. यासाठी क्लिकझॅप नावाचे अगदी छोटेसे ॲप्लिकेशन कामास येते.विण्डोज २००० आणि एक्सपी वापरणारे या ॲप्लिकेशनचा उपयोग करू शकतात.व्हिस्टा किंवा सेव्हन वापरणारयांनी ट्राय करून पाहण्यास हरकत नाही.



वास्तवाचा किंचीतही स्पर्श नसलेल्या खर्चाची आकडेवारी तयार करणारे आयोगाचे सदस्य अधिकारी आणि याला मान्यता देणारे आपले पंतप्रधान ३८ रूपये भाव असलेले दूध रोज २ रूपये ३३ पैशात पिऊ शकतील याचे उत्तर यांनीच दिले तर बरे होईल. तर असे कोणते दुकान भाजी मंडई सरकारने उघडलेले आहे की एवढया स्वस्तात या वस्तू मिळतील. आयोगच्या या निकषांपेक्षा एक रूपयाही जास्त कमाविला तर व्यक्ती आपल्या कुटुंबाचे पालनपोषन चांगले करू शकते. असे आयोगाने कसे मानले म्हणजे ३१ रूपये खर्च करणारा माणूस गरिब आणि ३२ रूपये खर्च करणारा माणूस गरिब नाही मात्र आयोगाने पर्यायाने सरकारने हे वास्तव नाकारले आहे. फक्त कागदोपत्री दारिद्र्याचा शिक्का हटविण्याचा हा प्रयत्न आहे.मागील एका वर्षापासून सरासरी दहा टक्के महागाई आहे काही वेळेला हा दर १८ टक्क्यांच्याही पुढे गेला होता. महागाईने पैशाची खरेदीक्षमताही कमी होते. त्यामुळे आज शंभर रूपयालाही तशी फारशी किंमतही नाही. पाचशे रूपयात एका हाताच्या बोटावर मोजता येतील एवढयाही वस्तू येत नाहीत. वाढती महागाई आणि पैशाचे कमी होत असलेले मूल्य डोळयासमोर ठेवून काही दिवसांपूर्वी सरकारणे १ हजार रूपयांच्या अधिक नोटा छापण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी या नोटा मर्यादीत स्वरूपात होत्या. म्हणजे एकिकडे सरकार १०० आणि ५०० रूपयांना फारशी किंमत राहिली नाही म्हणून १ हजार रूपयांच्या नोटा जास्त छापते. आणि दुसरीकडे फक्त ९६५ रूपये तुम्हाला महिण्याला पुरेसे आहेत असे म्हणते. किती विरोधाभास हा ..? दुसरा विरोधाभास म्हणजे. नुकत्याच पेट्रलच्या किमती तीन रूपयांनी वाढवल्या. घरगुती गॅस ची दरवाढ करण्याचेही प्रस्तावित आहे. लवकरच य किमती वाढतील. डिझेल व केरोसिनच्या किंमती ठराविक काळानंतर वाढतच आहेत. आपल्यावरील अनुदानाचा बोजा कमी करण्यासाठी आम आदमीला सरकार महागाईच्या खाईत लोटत आहे आणि दुसरीकडे दारिद्र्यरेषेखालील सुविधाही काढून घेत आहे. दारिद्र्याचे निकश बदलून मोठया लोकसंख्येला दारिद्र्यरेषेच्या बाहेर आणून उद्या सरकार दारिद्र्य हटविल्याचा डांगोरा पिटण्यास मोकळे होईल. पण या सुविधांपासून वंचीत राहणा-या सर्वसामान्यांची गुजराण कशी होईल. याचे सोयरसुतक मात्र सरकारला नाही. फक्त कागदी घोडे नाचवून वास्तव परिस्थितीकडे डोळेझाक करणा-या सरकारचा देशाची श्रीमंती मिरविण्याचा प्रयत्न दिसतोय. आज २६ टक्क्यांपेक्षा अधिक लोक दारिद्र्यात आहेत कदाचीत त्यामुळे सरकार कागदावरून दारिद्र्य मिटविण्याच्या मागे लागले असेल.मात्र या नादात देशातील तळयातल्या मोठ्या समूहांचा जगण्याचा हक्कच नाकारला जात असल्याचे भान या देशाच्या राजकारण्यांना आणि आपल्या अनर्थशास्त्राचे दर्शन घडविणा-या तज्ज्ञांना नाही. यापेक्षा आम आदमीचे दुर्दैव काय? कमीत कमी आतंरराष्ट्रीय मानकांच्या आकडयांचा तरी विचार केला असता तरी थोडाफार दिलासा मिळाला असता. पण, गगणाला भिडलेल्या महागाईत एवढेच पैसे पुरेसे असण्याची शक्यता नाहीच नवीन व्याख्या योग्य कि अयोग्य याचा विचार थोडा बाजुला ठेवला तरी यातून एक स्पष्ट होते. ती म्हणजे आजही ४१ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. यातील काहींना दोन वेळच्या अन्नाचीही भ्रांत आहे. खरे पाहिले तर देशातील १० ते १२ टक्के लोकसंख्या वगळली तर बाकी लोक कोणत्याही प्रकारे गरिबीतच दिवस काढत आहेत. मुंबईचेच उदाहरण द्यायचे झाले तर सरकारी आकडेवारी नुसार मुंबईत ४ टक्के लोक गरिब आहेत.पण वास्तव परिस्थिती अशी आहे की मुंबईतील ५५ टक्के जनता झोपडपट्टीत राहते.त्यांना दयनीय अवस्थेत रहावे लागत आहे. त्यामुळे आता गरज आहे ती गरिबी हटविण्यासाठी ठोस कार्यकम हाती घेण्याची. गरिबीचे नवीन निकष केले तरी वास्तव गरिबी कमी होणार नाही. कमी होईल ती फक्त कागदावरच. सरकारणे या आकडेवारिच्या वादविवादात न पडता गरिबांचे जीवनमान सुधारण्यासाठी पावले उचलने अनिवार्य आहे. दारिद्र निर्मुलन करायचे असेल तर सामाजिक विकास योजनांवर मोठया प्रमाणावर खर्च करण्याची गरज आहे. रोजगार निर्मीती करणे आवश्यक आहे. फक्त आकडेवारी कमी जास्त करून दारिद्र्य संपणार नाही. तर त्यासाठी सरकारणे तशी इच्छाशक्ती ठेवून ठोस कृती करायला पाहिजे. . . . . (समाप्त)

## बोले तारे

# नेपच्युन ग्रह –गुढतेचा सम्राट

सौ. नम्रता पाटिल

भविष्यकाळात डोकावून बघणे सर्वांनाच आवडत असते. म्हणुनच ज्योतिषशास्त्र आपल्याला जवळचे वाटते. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करताना प्रथम जाणवते ती या अभ्यासातील गुढता. प्रत्येक ग्रह आपापली गुढता वेळोवेळी दाखवत असतो. रवीचंद्राचे ग्रहणयोग असोत वा अन्य नवग्रहांचे शुभाशुभ योग असोत प्रत्येकजण गुढतेचे अवगुंठन घेऊन आपल्याला खुणावत असतो. हर्षलची स्फोटक गुढता भयभीत करते, प्लूटोची चमत्कृतीपुर्ण गुढता स्तिमित करते तर नेपच्युनची गुढता शीतल सुंदर चकित करणारी व मोहुन टाकणारी आहे. नेपच्युनची गुढता मन गोंधळुन टाकणारी असली तरी मनाला हवीहवीशी वाटते आणि म्हणुनच आज आपण नेपच्युनबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मानसिक तरलता, भावनांचा कल्लोळ, तीव्र संवेदनशीलता म्हणजेच नेपच्युन! पण याच्या शुभाशुभतेच्या मर्यादा काळजीपुर्वक पहाव्या लागतात. .जो नेपच्युन भावुकतेने एखादा कवी घडवु शकतो तोच नेपच्युन तोल सुटल्यावर एक वेडा जन्माला घालतो. .या दोहोतील सीमारेषा धुसर, अस्पष्ट असते हे प्राथम्याने समजुन घेणे गरजेचे आहे.

नेपच्युनचा शोध ब्रिटीश गणिती आडाम व फ्रेंच खगोलतज्ञ लिव्हेरिअर यांनी १८४६ मध्ये लावला. सूर्यापासुन हा सुमारे २७९.३ कोटी मैल दुर असुन त्याची सूर्याभोवतीची एक प्रदक्षिणा १६४ वर्षे २८० दिवसांत पूर्ण होते.

महाभारत काळात हा ग्रह श्वेत या नावाने ओळखला जात होता. व त्याच्या परिणामांची व कारकत्वाची पुर्ण ओळखही भारतीय ऋषीमुनींना होती. आज नेपच्युनला भारतीय संस्कृतीत वरूण हे नाव आहे.

<u>नेपच्युनच्या अंमलाखाली येणाऱ्या गोष्टी–</u>

मानसिक शक्ती,अंतःस्फुर्ती,काव्य, भावुकता,मादक पदार्थ ,वायु, गुढशास्त्रे या गोष्टी तसेच कवी, गायक, वादक, मानसोपचार , जहाज वाहतुक, धार्मिक संस्था, धर्मशाळा, हॉस्पिटल, गुढयंत्रतंत्र, गुप्तहेर, कापुर, तंबाखू, चहा, कॉफी, कलाकार, हिप्नॉटिझम, फसवणुक करणारे भामटे यांवर नेपच्युनचा अंमल असतो.

<u>नेपच्युनमुळे होणारे संभवनीय विकार–</u>

बिघडलेला नेपच्युन जर जन्मपत्रिकेत ६–८–१२ स्थानी असता तर वेड लागणे, भ्रम होणे,नेत्रविकार,विषप्रयोग,कृष्ठ, शितविकार, प्लूरसी, ॲलर्जी हे संभवनीय विकार आहेत.

नेपच्यूनचे कारकत्व बरेचसे चंद्रासारखे आहे. मन भावना यावर परिणाम जास्त होतात.त्याचप्रमाणे गुरत्र्जी उच्च व प्रगत फले जसे नैतिकता,धार्मिकता,मानसिक धारणा, अध्यात्मिक प्रगती इ. शुभ गुण गुरत्र्पेक्षा नेपच्युन अधिक पटीने देतो. तर कधकधी एखादया बालकासारखी वागणारी व्यक्ती अचानकपणे सायकीयपणे वागु शकते ती या नेपच्यूनच्याच अशुभ योगामुळे.यामुळेच नेपच्युनचे जन्मपत्रिकेतील भाव व राशींनुसार होणारे योग अभ्यासनीय आहेत.यादृष्टीने प्रथम स्थानांनुसार (तो कोणत्या स्थानात आहे त्यानुसार) त्याची गुढतेकडे झुकणारी फले आपण भाग २ मध्ये पाहूया.

# प्रगती करीअर ॲकेडमी : बँका , फायनान्शिअल व इन्शुरन्स क्षेत्रात करीअर करण्यास भरपूर वाव

## <u>करिअर गुरू</u>

भारत देश हा जागतिक स्तरावर आर्थिक महासत्ता बनण्याकडे वेगाने वाटचाल करीत आहे. अशात भारत सरकारने मुक्त बाजारपेठाचे स्वीकारलेले व्यापारी धोरणामुळे जागतिक स्तरावरील अनेक नामवंत कंपन्या व संस्था भारतात गुंतवणुक करण्यास उत्सुक आहेत. मागील काही वर्षांचा आढावा घेतल्यास आपणास चटकन लक्षात येईल की भारतात अनेक क्षेत्रात खास करून बँकींग फायनान्शिअल व इन्शुरन्स या क्षेत्रात अधिकप्रमाणात कंपन्यांचा ओढा वाढत आहे.

बँकेत नोकरी मिळवण्यासाठी पदवीसह एखादया विषयात प्रावीण्य मिळवणं आवश्यक आहे. बँकेत नोकरी मिळवण्यासाठी बारावीनंतरचा बी.कॉम (बँकिंग ॲण्ड इन्शुरन्श) हा डिग्री कोर्स करता येतो. याचा कालावधी तीन वर्षांचा आहे. हा कोर्स पार्टटाइम करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. बारावी नंतर अकाऊण्टिंग ॲण्ड फायनान्समध्येही बी.कॉम करता येतं. पण त्यासाठी बारावीत किमान पन्नास टक्केगुण मिळवणं आवश्यक आहे. बारावीनंतर डिप्लोम इन बँकिंग हा एक वर्षाचा कोर्सही चालविण्यात येतो. बँकिंगचं शिक्षण घेतल्यानंतर राष्ट्रीय व खाजगी तसेच सहकारी बँकेत कारकुन आणि ऑफिसर अशा दोन्ही प्रकारचे जॉब्स मिळू शकतात. याशिवाय इन्कम टॅक्स. अकाऊण्टिंग , इण्डस्ट्रीयल लॉ, इन्शुरन्स स्टॉक, मार्केटिंग आणि ब्रोकिंग कंपन्यांमध्ये काम करता येतं.

तसेच बँकिंग इन्स्टीटयुट व विविध स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण संस्थांमध्येही बँकिंगचे कोर्स चालविले जातात. याच संस्थामधून बँकिंग क्षेत्रातील परिक्षेबददल मार्गदर्शन वर्ग चालविले जातात. मुंबईत दादर , ठाणे , बांद्रा तसेच नवी मुंबई याठिकाणी वर्ग चालविले जात आहेत.

इन्शुरन्स म्हणजेच विमा संकल्पनेबद्दल भारतीय समाजात जागरूकता वाढत आहे. परिणामी विमा क्षेत्रात येणा-या कंपन्यांचं प्रमाणही वाढत आहे. विमाक्षेत्रात खाजगी उद्योगांना प्रवेश दिल्यापासून या क्षेत्रातील स्पर्धा वाढली आहे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ग्राहकांना नवनवीन सुविधा विमा कंपन्या पुरवत आहेत. यासाठी विमा कंपन्यांना कौशल्यपूर्ण मणुष्यबळाची गरज भासत आहे.

इन्शुरन्स क्षेत्रात काम करू इच्छिणा-यांनी आवश्यक असणारं शिक्षण घेतलं पाहिजे. एमबीए इन्शुरन्स मॅनेजमेण्ट हा इन्शुरन्समध्ये पदार्पण करण्यासाठी फायदेशीर ठरणारा कोर्स आहे. दोन वर्षाच्या या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी कुठल्याही शाखेची डिग्री (किमान ५० टक्के) असणं गरजेचं आहे. ग्रॅज्युएट झालेले विदयार्थी बिझनेस मॅनेजमेण्ट (इन्शुरन्स) हा कोर्सही करू शकतात. एक वर्ष मुदतीचा हा कोर्स पार्टटाइम आहे. एक वर्षाचा फुलटाइम कोर्स करू इच्छिणा-यांसाठी डिप्लोमा इन इन्शुरन्स ॲण्ड सेल्सचा पर्यायही खुला आहे. त्यासाठी ग्रज्युएशन पूर्ण असणं आवश्यक आहे. ॲक्च्युअरी हा आणखी एक कोर्स आहे. भूतकाळात घडलेल्या घटनांच्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्याचं काम ॲक्च्युअरी करतात. मॅथमॅटिक्स आणि स्टॅटिस्टीक्सची उत्तम जाण असलेले विदयार्थी हा कोर्स करू शकतात.

इन्शुरन्स क्षेत्रात करिअरच्या विविध संधी उपलब्ध आहेत. विमाक्षेत्रात करिअर करू इच्छिणा-या व्यक्तींना मार्गदर्शन करण्यात इन्शुरन्स इन्स्टिटयुटमध्ये लाइफ इन्शुरन्स आणि जनरल इन्शुरन्सच्या दोन्ही. मुख्य प्रकारांत सर्टिफिकेट, डिप्लोमा आणि डिग्री कोर्सेस उपलब्ध आहेत. तसेच इन्शुरन्स रेग्युलेटरी डेव्हलपमण्ट ॲथॉरिटी (ईर्डा) च्या वतीने इन्शुरन्स ॲडव्हायझर (एजण्ट) बनण्यासाठी आवश्यक असणारी परीक्षा या संस्थेमार्फत घेण्यात येते.

बँकिंग , इन्शुरन्स , बँकिंग असा सर्वच वित्तीय संस्थांमध्ये आज उच्चशिक्षित कर्मचा-यांची आवश्यकता आहे. इन्व्हेस्टमेण्ट , इन्शुरन्स , टॅक्सेशन या विषयाचं सखोल ज्ञान असणा-या व्यक्तींची या क्षेत्राला गरज आहे. नेमकी ही गरज लक्षात घेऊन सर्टिफाइड फायनान्शिअल प्लॅनर हा कोर्स तयार करण्यात आलेला आहे. गुंतवणूकदाराला त्याची आर्थिक ध्येयं योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचं काम सर्टिफाइड फायनान्शिअल प्लॅनरचं असतं. हा कोर्स भारतात फायनान्शिअल प्लॅनिंगमधलं सी.एफ.पी. हे जागतिक मान्यता असलेलं सर्वोच्च शिक्षण आहे. हा कोर्स भारतात फायनान्शिअल प्लॅनिंग स्टॅण्डर्ड बोर्डामार्फत सुरू करण्यात आला आहे. दहावी उत्तीर्ण झालेला विदयार्थीसुध्दा हा कोर्स करू शकतात. सीएफपी केल्यानंतर विदयार्थी बँक, इन्शुरन्स कंपन्या, ब्रोकिंग फर्म, म्युच्युअल फंड असा विविध संस्थामध्ये जॉब करू शकतात.

तसेच सी.एफ.पी. केल्यानंतर विदयार्थी सीए प्रमाणे स्वतःचा व्यवसाय करू शकतात.

मित्रांनो करिअर घडविणे हे आपल्या हाती असते. त्यासाठी फक्त प्रबळ ईच्छाशक्ती आणि योग्य मार्गदर्शन हवे असते. चला तर आजच तयारीला लागा.

- श्री. किरण राणे

हे पाक्षिक वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक किरण श्रीकांत राणे यांनी ४०००८६ येथे छापून प्रगती फाऊंडेशन, १०१, पहिला मजला , जीवन ज्योत हॉस्पिटल , श्रध्दानंद रोड, रेल्वे स्टेशन समोर घाटकोपर (पश्चिम) , मुंबई. जि. मुंबई ४०००८६ येथे प्रसिध्द केले आहे. मो.नं. ९८२१२४५६१३ (संपादक) / ९२२४८८६६८९ (उपसंपादक) ई मेल :yuvapragatee@gmail.com